# बृहन्मुंबई महानगरपालिका

## उद्यान खाते

क्र. एसजी/ओडी/२५७ दि.०१.०८.२०२३

**विषय : मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे दत्तक तत्वावर देण्याबाबतचे प्रारूप प्रस्तावित धोरण.**

मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून अत्यंत दाट लोकवस्तीचे शहर आहे. या शहरातील लोकांच्या घराचा अत्यंत छोटा आकार पाहता त्यांच्या निखळ मनोरंजन आणि आरोग्यासाठी मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मोकळ्या जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. सबब विकास नियंत्रण नियमावली 2034 नुसार विकास नियोजन आराखडयात उदयाने/मनोरंजन मैदाने/ खेळाची मैदाने व उपवने या सारखी आरक्षणे ठेवण्यात आलेली आहेत.यापैकी महानगरपालिकेच्या उद्यान खात्या मार्फत एकूण 562 हेक्टर क्षेत्रफळाचे 1104 भूभाग ताब्यात घेण्यात आले असून अजून काही भूभाग ताब्यात घेण्यात येणार आहेत. प्रत्येक आरक्षित भूभाग विकसित करण्यासाठी व सार्वजनिक उद्दिष्टाकरिता वापरात येण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिका कसोशीने प्रयत्न करत आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये या जागांच्या विकासासाठी व देखभालीसाठी महानगरपालिकेने मोठया प्रमाणात आर्थिक तरतूद करुन अनेक उद्याने विकसित केलेली आहेत. तथापि, मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे सुरक्षित ठेवण्यामध्ये महानगरपालिकेला यश मिळाले असले तरी त्या ठिकाणी वेगवेगळया खेळांसाठी आवश्यक सुविधा व इतर सोयीसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. सबब मनोरंजन मैदाने व क्रीडांगणांचा विकास, देखभाल व दुरुस्ती ही स्थानिक संस्था, संघटना, औद्योगिक उपक्रम इत्यादिंच्या सामुदायिक सामाजिक दायित्वातून करण्यासाठी आवश्यक भांडवली खर्चाच्या प्रमाणात वेगवेगळ्या मुदतीसाठी सदर मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे दत्तक तत्त्वावर देण्याबाबत धोरण ठरवण्याची आवश्यकता होती. या आवश्यकतेतून सदर धोरण ठरविण्यात आले असून त्यातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

**I) <u>पात्रतेचे निकषः</u>**

**अ) मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे विकसित/परिरक्षित करावयाच्या पध्दती -**

1. ज्या भूखंडावर उद्याने विकसित करण्यात आली आहेत ते भूखंड महापालिकेने स्वतः किंवा स्वतःच्या निधीतून कंत्राटदार नेमून परिरक्षित करावेत. असे भूखंड दत्तक तत्त्वावर दिले जाणार नाहीत.
2. शक्यतोवर सर्व मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे महापालिकेने स्वतःच्या निधीतून कंत्राटदार नेमून किंवा सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) धोरणानुसार निविदा मागवून विकसित/परिरक्षित करावीत.
3. अपवादात्मक परिस्थितीत एखादे मनोरंजन मैदान अथवा क्रीडांगण आर्थिक, तांत्रिक, विशिष्ट स्थानिक अथवा इतर कोणत्याही कारणास्तव उपरोक्त पद्धतीने विकसित/परिरक्षित करणे महापालिकेस शक्य नसल्यास योग्य त्या कारणमीमांसेसह ते दत्तक तत्त्वावर देता येईल.
4. मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे दत्तक देताना स्थानिक शाळांच्या संघास व स्थानिक ए एल एम यांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल.

   स्थानिक शाळांच्या संघामध्ये त्या भागातील सर्व किंवा बहुतांश (विद्यार्थी संख्येच्या आधाराने) शाळांचा सहभाग असणे बंधनकारक असेल. ज्या शाळा या संघाच्या सभासद होणार नाहीत त्यांनाही विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात ठरविलेल्या मनपा-मान्य रास्त दराने क्रीडांगणाची सुविधा देणे संघास बंधनकारक असेल. शाळा चालू असताना सकाळी 3 तास व संध्याकाळी 3 तास आणि सुट्टीच्या दिवशी सर्वकाळ सर्वसामान्य नागरिकांस मोफत प्रवेश दिला जाईल व काही किमान सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जातील. तथापि संघाने भांडवली खर्च करून तयार केलेल्या क्रीडा व मनोरंजन सुविधांच्या वापरासाठी सर्वसामान्य नागरिकांकडून मनपा मान्य रास्त दराने शुल्क आकारता येईल .

**ब) मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे दत्तक तत्त्वावर देण्याचा कालावधी -**

1) जी मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे विकसित आहेत व ज्यांच्या दर्जोन्नतीसाठी येणारा भांडवली खर्च रक्कम रु. ५००/- प्रति चौ.मी. पेक्षा कमी आहे अशी मैदाने ११ महिन्यांच्या मुदतीसाठी दत्तक तत्वावर देता येतील.

2) जी मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे अर्धविकसित आहेत व ज्यांच्या दर्जोन्नतीसाठी रक्कम रु. ५००/- ते रक्कम रु. २०००/- प्रति चौ.मी. एवढा भांडवली खर्च करणे आवश्यक आहे अशी मैदाने तीन वर्षे मुदतीसाठी दत्तक तत्वावर देता येतील.

3) जी मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे फारशी विकसित नसून त्यांच्या दर्जोन्नतीसाठी रक्कम रु. २०००/- प्रति चौ.मी. पेक्षा जास्त खर्च अपेक्षित आहे अशी मैदाने पाच वर्षे मुदतीसाठी दत्तक तत्वावर देता येतील.

4) वर देण्यात आलेला दत्तक कालावधी हा भुखंडावर अपेक्षित भांडवली खर्चाच्या परतफेडीसाठी ढोबळमानाने आवश्यक कालावधीचा विचार करुन देण्यात आला आहे. असे असले तरी महापालिका आयुक्तांना खर्च/उत्पन्न यांचा ताळेबंद पाहून तो दत्तक कालावधी 10 वर्षापर्यंत वाढवता येईल.

**क) अर्ज करण्यासाठी पात्र संस्थांचा निकष -**

1. स्थानिक शाळांचा संघ, स्थानिक ए एल एम स्वतंत्रपणे किंवा एखाद्या प्रायोजक संस्थेशी भागीदारी मध्ये अर्ज करू शकतील.
2. नोंदणीकृत संघ/स्थानिक गृहनिर्माण संस्थांचे महासंघ/ रहिवासी संघटना/ व्यापारी संघटना/ दुकानदारांची संघटना/ अशासकीय संस्था.
3. सार्वजनिक उपक्रम / सरकारी संस्था /बँक - सामुदायिक सामाजिक दायित्व (**CSR**) मधून
4. प्रशासकिय विभागातील क्रीडाविषयक उपक्रम राबविणारी/ प्रायोजित करणारी संस्था/ संघटना/ शैक्षणिक संस्था
5. नोंदणीकृत, प्रतिष्ठित व नामवंत खाजगी कंपनी,खाजगी बँक, वित्तसंस्था - सामुदायिक सामाजिक दायित्व (**CSR**) मधून
6. मनोरंजन मैदान अथवा क्रीडांगण वैयक्तिकरित्या कोणत्याही व्यक्तीस दत्तक तत्त्वावर घेता येणार नाही.

**II) <u>दत्तक तत्वावर देण्याबाबत प्रसिध्दी:</u>**

प्रत्येक विभागाचे सहाय्यक आयुक्त, परिमंडळ उप उद्यान अधिक्षक यांच्या सल्ल्याने व परिमंडळ उपायुक्त यांच्या मान्यतेने दत्तक तत्त्वावर देणे गरजेचे आहे अशा मनोरंजन मैदानांची व क्रीडांगणांची यादी निश्चित करतील.

या यादीस विभागाच्या सूचना फलकावर, यादीतील प्रत्येक मनोरंजन मैदान/क्रीडांगणाच्या ठिकाणी (प्रत्येक प्रवेश द्वारावर 6 फूट X 4 फूट आकाराचा फलक लावून), महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर व प्रमुख वृत्तपत्रांमधून (इंग्रजी व मराठी) जाहिरातीव्दारे प्रसिद्धी देऊन

1) नागरिकांकडून/संस्थांकडून यादीतील मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे दत्तक तत्वावर देण्याबाबत **हरकती अथवा सूचना** तसेच

2) वेगवेगळ्या संस्थांकडून सदर मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे दत्तक तत्त्वावर घेण्यासाठी **अर्ज** 30 दिवसांची मुदत देऊन मागविण्यात येतील.

उपरोक्त प्रमाणे व्यापक प्रसिद्धीद्वारे नागरिकांना हरकती व सूचना नोंदवण्याची तसेच इच्छुक संस्थांना सहभागी होण्याची समान संधी न देता एखाद्या संस्थेस एखादा भूखंड (ती संस्था पात्र असली तरी) दत्तक तत्वावर देता येणार नाही.

**III) अर्ज /हरकती/ सूचना सादर करणे:**

- नागरिक/संस्था यांनी महानगरपालिकेने सार्वजनिक सूचना दिल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत यादीतील मनोरंजन मैदाने व क्रीडांगणे दत्तक तत्वावर देण्याबाबत **हरकती अथवा सूचना** सादर कराव्यात.

तसेच दत्तक तत्वावर भूखंड घेण्यामध्ये इच्छुक असणाऱ्या संस्था/संघटना यांनी खालील कागदपत्रांसह विशिष्ट मैदान हे दत्तक तत्वावर घेण्याकरिता **अर्ज** करावा.

1. मागील तीन वर्षांचे लेखापरिक्षीत आर्थिक ताळेबंद (आर्थिक क्षमता)
2. अशासकीय संस्थेचे कार्यक्षेत्र दर्शविणारी कागदपत्रे
3. पूर्वी सुविधेचा विकास/देखभाल केली असल्याबाबतचे पूर्वानुभवाचे प्रमाणपत्र
4. सुविधेच्या विकासाचा प्रस्तावित योजनेचा आराखडा व अनुज्ञापन कालावधीत देखभाल करण्याबाबतचा योजनेचा आराखडा (कृपया परिशिष्ट दोन पाहावे)
5. स्थानिक रहिवाशी संघटना व सार्वजनिक संस्था/निगम/कंपनी यांच्यामधील सामंजस्य कराराची प्रमाणित प्रत.

**IV) परिमंडळ छाननी समिती व शिफारस समिती:**

1. प्राप्त होणाऱ्या अर्ज /हरकती/ सूचना यांची छाननी करण्याकरिता प्रत्येक परिमंडळामध्ये छाननी समिती स्थापन करण्यात येईल.
2. परिमंडळ छाननी समितीत पुढील सदस्य असतील.
   1. परिमंडळ उपायुक्त - अध्यक्ष
   2. सहाय्यक आयुक्त, संबंधित विभाग
   3. विभाग कार्यकारी अभियंता
   4. उप उद्यान अधीक्षक संबंधित परिमंडळ - सदस्य सचिव
   5. सहाय्यक उद्यान अधीक्षक संबंधित विभाग
3. परिमंडळ छाननी समिती सर्वप्रथम मनोरंजन मैदान/ क्रीडांगण दत्तक तत्वावर देण्याबाबत नागरिकांनी/ संस्थांनी घेतलेल्या हरकती व दिलेल्या सूचना यांचा अभ्यास करून आवश्यकता भासल्यास संबंधितांना सुनावणी देऊन सदर मनोरंजन मैदान/ क्रीडांगण दत्तक तत्वावर द्यायचे की नाही याविषयीचा निर्णय घेईल.
4. मनोरंजन मैदान/ क्रीडांगण दत्तक तत्वावर न देण्याचा निर्णय झाल्यास त्या मनोरंजन मैदान /क्रीडांगणासाठी अर्ज केलेल्या संस्थांना तसे कळवण्यात येईल
5. मनोरंजन मैदान/ क्रीडांगण दत्तक तत्वावर देण्याचा निर्णय झाल्यास प्राप्त प्रस्तावांची मुद्दा क्र.X मधील निकषानुसार मूल्यांकन करून प्रतिसादात्मक अथवा ना-प्रतिसादात्मक या शेऱ्यासह ३० दिवसात छाननी केली जाईल.
6. परिमंडळ छाननी समिती प्राप्त हरकती/ सुचना, तीने केलेली छाननी, मूल्यांकन तक्ता व समितीच्या अभिप्रायासह सर्व प्राप्त प्रस्ताव मुख्य छाननी समितीकडे ६० दिवसात पाठविल.
7. मुख्य छाननी समितीत पुढील सदस्य असतील.
   1. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (उद्यान विभाग-प्रभारी) अध्यक्ष
   2. उपायुक्त (उद्याने)
   3. परिमंडळ उपायुक्त
   4. उद्यान अधीक्षक सदस्य सचीव
   5. परिमंडळाचे उप उद्यान अधीक्षक
8. मुख्य छाननी समिती परिमंडळ छाननी समितीने सादर केलेली कागदपत्रे व अभिप्राय यावर विचार करुन यशस्वी संस्थेची निवड करील. त्याप्रमाणे ९० दिवसात अर्जदारास कळविण्यात येईल.

**V) <u>स्विकृतीचे पत्र</u>**

विभागाचे सहाय्यक आयुक्त निवडलेल्या संस्थेला कामाच्या व्याप्तीनुसार भूखंडाच्या विकासाकरीता विशिष्ट कालावधी देऊन स्विकृतीचे पत्र जारी करतील. स्विकृतीपत्रानंतर संस्था विस्तृत आराखडे व अंदाजपत्रके बनवून त्यास परिमंडळ उपायुक्तांची मंजूरी घेऊन एक महिन्याच्या आत प्रत्यक्ष कामास सुरुवात करील व परिमंडळ उपायुक्त यांनी दिलेल्या मुदतीत तथापि एक वर्षाच्या आत काम पूर्ण करील.

**VI) <u>करार पत्र</u>**

निवड झालेल्या संस्थेने रू. 500/- च्या मुद्रांक कागदावर मुंबई महानगरपालिकेबरोबर विहित नमुन्यात नोंदणीकृत करारपत्र करावे. या करारपत्राच्या मसुद्यामध्ये सदर धोरणाच्या अनुषंगाने नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन, मार्गदर्शक तत्वे, तसेच अनुज्ञापन शुल्क, परिरक्षण शुल्क व इतर महत्वाच्या बाबींचा ठळकपणे उल्लेख असावा व त्यांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र असावे. सदर नमुना प्रत्येक प्रकरणांमध्ये परिस्थितीनुरूप योग्य तो बदल किंवा नविन बाबी अंतर्भूत करून परिमंडळीय उपायुक्त विधी अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार तयार करतील व स्वतःच्या स्वाक्षरीने पारित करतील. सदर करारपत्र तयार करण्याकरिता व नोंदणीकृत करण्याकरिता येणारा खर्च सदर संस्था/संघटना करेल.

**VII) <u>कार्यानुरूप हमी (Performance Guarantee)</u>**

भुखंड दत्तक तत्वावर दिलेल्या संस्थेने परिशिष्ट -1 मध्ये दिल्याप्रमाणे कार्यानुरुप हमी बँक गॅरंटी स्वरुपात द्यावी. ही बँक गॅरंटी रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या 'www.rbi.org.in' या अधिकृत संकेतस्थळावरील रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियम,1934 अन्वयेच्या अनुसूची 2 मधील (आय.डी.बी.आय. बँक वगळता) बँकेकडून प्राप्त केलेली असावी (परिपत्रक क्र.सीए/एफबीके/241, दि.27.11.2019) व करारनाम्याचे विनिर्दिष्ट कालावधीकरिता विधीग्राहय असावी. विकास कामे विहित कालावधीत पूर्ण केल्यानंतर बँक गॅरंटी मुक्त केली जाईल.

**VIII)<u>अनामत रक्कम (Security Deposit)</u>**

निवड झालेल्या संस्थेला १ महिन्याच्या आत परिशिष्ट 1 मध्ये दिल्याप्रमाणे अनामत रक्कम महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल.

**IX)<u>देखरेख समिती</u>**

- विकास कामाचा दर्जा, गती व अटीशर्तीचे पालन या दृष्टीकोनातून संस्थेच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्याकरिता देखरेख समिती स्थापन केली जाईल.
- देखरेख समितीत खालील सदस्य असतील,
    1. विभागाचे सहाय्यक आयुक्त — अध्यक्ष
    2. स्थानिक नगरसेवक
    3. सहाय्यक अभियंता परिरक्षण
    4. सहाय्यक उद्यान अधीक्षक — सदस्य सचिव
    5. स्थानिक ए एल एम यांचा प्रतिनिधी
- दत्तक दिलेल्या जागेची पाहणी करून महिन्यातून किमान एकदा देखरेख समितीची बैठक बोलावली जाईल.
- उक्त बैठकीचे इतिवृत्त परिमंडळ उपायुक्तांना पाठविले जाईल.
- देखरेख समिती जागेवर प्रत्यक्ष पाहणी करेल आणि त्यांच्या निरिक्षणांची नोंद करेल.
- विभागीय सहाय्यक उद्यान अधिक्षकांनी ठेवलेल्या नोंदवहीत कालावधी, निरीक्षणे व मते नोंदविली जातील
- भूखंडावर होणारी सर्व विकास कामे देखरेख समितीच्या मार्गदर्शनखाली व नियंत्रणाखाली होतील.
- देखरेख समितिने दिलेल्या निर्देशांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक असेल.
- देखरेख समितीने दिलेल्या सूचनांचे संस्थेने पालन न केल्यास देखरेख समिती संस्थेचा भूखंड काढून

घेण्याची व अनामत रक्कम जप्त करण्याची शिफारस उपायुक्त परिमंडळ/अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (उद्यान प्रभारी) व महानगरपालिका आयुक्त यांना पाठवेल.

**X) (अ)<u>मूल्यमापन.</u>**

| अ.क्र. | निकष | दिले जाणारे गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|
| 1 | अर्जाची पार्श्वभूमी<br>1) स्थानिक शाळांचा संघ, स्थानिक ए एल एम<br>2) सार्वजनिक उपक्रम / सरकारी बँक - सामुदायिक सामाजिक दायित्व (CSR) मधून<br>3) नोंदणीकृत,प्रतिष्ठित व नामवंत खाजगी कंपनी,खाजगी बँक, वित्तसंस्था -सामुदायिक सामाजिक दायित्व (CSR) मधून<br>किंवा<br>प्रशासकिय विभागातील क्रीडाविषयक उपक्रम राबविणारी व राज्यशासनाच्या क्रीडा खात्याशी सलग्न असणारी धर्मादाय / सहकारी संस्था<br>4) प्रशासकिय विभागातील क्रीडाविषयक उपक्रम राबविणारी / प्रायोजित करणारी इतर धर्मादाय / सहकारी संस्था | 20<br>15<br>10<br>5 | 20 |
| 2 | सुविधा विकसित करण्याचा/देखभाल करण्याचा पूर्वीचा अनुभव<br>1) 15 वर्षा पेक्षा जास्त<br>2) 10 वर्षापेक्षा जास्त<br>3) 05 वर्षापेक्षा जास्त | 15<br>10<br>5 | 15 |
| 3 | आर्थिक उलाढाल<br>1) भूखंडाच्या अंदाजे विकास खर्चाच्या 150% पेक्षा जास्त वार्षिकआर्थिक उलाढाल असणारी संघटना / संस्था (कृपया परिशिष्ट एक पहावे)<br>2) भूखंडाच्या अंदाजे विकास खर्चाच्या 100% पेक्षा जास्त वार्षिक आर्थिक उलाढाल असणारी संघटना / संस्था (कृपया परिशिष्ट एक पहावे)<br>3) भूखंडाच्या अंदाजे विकास खर्चाच्या 50% पेक्षा जास्त वार्षिक आर्थिक उलाढाल असणारी संघटना / संस्था (कृपया परिशिष्ट एक पहावे) | **20**<br>15<br>10 | 20 |
| 4 | संस्था/संघटना यांचे कार्यक्षेत्र<br>1) नगरसेवक मतदार प्रभागातील अशासकिय संस्था.<br>2) प्रभागातील अशासकिय संस्था<br>3) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अशासकिय संस्था | 15<br>10<br>5 | 15 |
| 5 | भूखंडाच्या विकासाकरिता व देखभालीकरिता प्रस्तावित केलेली योजना (छाननी समिती ठरवेल त्याप्रमाणे) | | 30 |
| | एकूण | | 100 |

- उक्त मूल्यांकनानुसार संस्थेस किमान 50 गुण मिळणे आवश्यक आहे.

XI) <u>अटी व शर्ती :</u>

1. सदर भूखंड दत्तक तत्त्वावर संस्थेला 3/5 वर्षांच्या कालावधीकरिता दिला असला तरी विभागाचे सहाय्यक आयुक्त अनुज्ञापनाच्या कालावधीत मार्गदर्शक तत्वांतील अटी व शर्तींची पुर्तता केल्याची पडताळणी केल्यानंतर सदर परवानगीचे दरवर्षी नुतनीकरण करतील.
2. सदर भूखंड दत्तक तत्त्वावर फक्त विकसित व परिरक्षणासाठी देण्यात येत असून भूखंडावर अथवा त्यातील सुविधेवर संस्थेस कोणताही प्रकारे मालकी अथवा इतर कोणताही हक्क मागता येणार नाही.
3. संस्थेला उक्त भूखंडावर शौचालय (DCPR 2034 Rule 61), सुरक्षा रक्षक चौकी (DCPR 2034 Rule 42(ii)g) इ. व्यतिरिक्त कोणतेही बांधकाम करता येणार नाही. व्यायामशाळा / क्लब हाऊस किंवा तत्सम बांधकाम करता येणार नाही.
4. संस्थेने द्यावयाच्या सर्व सुविधा <u>प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य</u> या तत्त्वाने मनपाने तयार केलेल्या / मान्यता दिलेल्या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.
5. भूखंडाचा ताबा घेतल्यानंतर भूखंडाचे संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.
6. भूखंड दत्तक घेणाऱ्या संस्थेस मैदानातील प्रवेशासाठी कोणतेही शुल्क आकारता येणार नाही.
7. खेळाच्या सुविधेसाठी संस्थेस जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी विविध क्रीडा सुविधांसाठी त्यांच्या दर्जानुसार ठरवलेल्या दरावर आधारित महानगरपालिकेने ठरवलेले दर महानगरपालिका आयुक्त यांच्या पूर्वपरवानगीने आकारता येतील. उपरोक्त सुविधा वर म्हटल्याप्रमाणे पारदर्शक संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन उपलब्ध करणे बंधनकारक राहील.
8. संस्थेस सुविधेचा खेळाव्यतिरिक्त इतर कोणताही व्यावसायिक वापर करता येणार नाही.
9. भूखंडांच्या प्रवेशव्दाराशी संस्था/संघटनेने भूखंडावर तरतूद केलेली विविध सुविधा दर्शविणारा फलक लावावा.सदर फलकाचा आकार 6 फूट X 4 फूट किंवा महानगरपालिकेच्या मंजूर मानकांप्रमाणे विनिर्दिष्ट असणे आवश्यक आहे.
10. संस्था/संघटनेने सदर भूखंडामध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याकरीता जैविक खत निर्माण सुविधेची तरतूद करावी.
11. सदर संस्थेने भूखंडाचा विकास व त्यावरिल सोयीसुविधांचा विकास तसेच परिरक्षण स्वखर्चाने व स्वतःच्या जोखमीवर करावा.
12. सहाय्यक आयुक्त यांच्या निर्देशानुसार शौचालय, पिण्याचे पाणी, प्रथमोपचार सुविधा इ. सुविधा पुरविण्यात याव्यात.
13. भूखंड सर्वसामान्य नागरिकांसाठी मनपाने निश्चित केलेल्या वेळांसाठी इतर महानगरपालिका मैदानांप्रमाणे खुला ठेवणे बंधनकारक राहील .
14. संस्थेस सदर भूखंडामध्ये संस्थेचे कार्यालय स्थापन करता येणार नाही तसेच संस्थेच्या खाजगी बैठका घेता येणार नाहीत.
15. मैदानाचे नामकरणाचे सर्व अधिकार महानगरपालिकेकडे राहतील तसेच कोणत्याही परिस्थितीत दत्तक तत्वावर भूखंड दिलेल्या संस्थेस मैदानाचे नामकरण करता येणार नाही.
16. उक्त संस्थेने सदर भूखंडापासून मिळणारे उत्पन्न व खर्च एका स्वतंत्र बँक खात्यामधून करावयाचा आहे. संस्थेस प्राप्त होणाऱ्या देणग्या, वापरकर्ता शुल्क व इतर सर्व प्राप्त रकमा या खात्यावर जमा होणे तसेच होणारा खर्च या खात्यातून करणे बंधनकारक राहील. उपरोक्त बँक खात्याचे मासिक स्टेटमेंट व संस्थेचा मासिक जमाखर्च ताळेबंद दर महिन्याला देखरेख समितीकडे जमा करणे दत्तक संस्थेस बंधनकारक राहील.
17. संस्थेस मुद्दा क्र 7 व 16 मध्ये विषद केलेल्या पध्दती व प्रयोजना व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने / प्रयोजनासाठी पैसे स्विकारता येणार नाहीत.
18. सदर मैदानांवर दत्तक संस्थेस महानगरपालिका, आमदार स्थानिक विकास निधी, खासदार स्थानिक विकास निधी, जिल्हा नियोजन मंडळ अथवा इतर कोणत्याही शासकीय यंत्रणेच्या निधीतून कोणतेही काम करुन घेता येणार नाही.
19. सर्वसामान्य नागरिकांना मैदानांचा पुरेपूर वापर करता यावा आणि यातून त्यांचे निखळ मनोरंजन व त्यांच्या आरोग्याचे संवर्धन व्हावे या हेतूने महानगरपालिका हे धोरण राबवत आहे. सबब या धोरणानुसार उपलब्ध होणाऱ्या सुविधा नागरिकांना पारदर्शकपणे व माफक किमंतीत मिळाव्यात अशी महानगरपालिकेची रास्त अपेक्षा आहे. सबब

संस्थेचा कारभार पारदर्शक नसल्याचे, संस्था काही नागरिकांकडून वर निर्देशित केलेल्या शुल्कावाचून अन्य कोणतेही शुल्क वसूल करत असल्याचे, सदर प्रकल्पासंदर्भातील एखादे शुल्क किंवा रक्कम वर निर्देशित बँक खात्याव्यतिरिक्त इतर खात्यांवर अथवा रोख स्वरूपात घेतल्याचे, काही विशिष्ट नागरिकांना सदर सुविधांचा लाभ पोहोचवला जात असल्याचे व इतर नागरिकांना डावलले जात असल्याचे निदर्शनास आल्यास अनामत रक्कम जप्त करून सदर भूखंड तात्काळ परत घेतला जाईल.

20. उपरोक्त मुद्दा क्र.19 व्यतिरिक्त भूखंडाची योग्यप्रकारे देखभाल न करणे, भूखंडाचा खेळाव्यतिरिक्त इतर वापर करणे, भूखंडावर अनधिकृत बांधकाम करणे, भूखंडाचा दिलेल्या वेळेत विकास न करणे, इतर कोणत्याही अटीशर्तीचा भंग करणे इ. कारणांसाठी अनामत रक्कम जप्त करुन सदर भूखंड तात्काळ परत घेतला जाईल.
21. एखाद्या संस्थेकडून दत्तक तत्त्वावरील भूखंड दत्तक कालावधी संपण्यापूर्वी अथवा संपल्यानंतर संस्थेच्या मुद्दा क्रमांक 19 किंवा 20 मधील अपराधांसाठी विहीत प्रक्रिया राबवून काढून घेतला असेल तर अशा संस्थेस कोणताही भूखंड पुन्हा दत्तक तत्त्वावर दिला जाणार नाही.
22. दत्तक कालावधी संपल्यानंतर दत्तक संस्थेस कोणत्याही प्रकारे कालावधी वाढवून दिला जाणार नाही. आवश्यकता भासल्यास या धोरणामध्ये दिलेले संपूर्ण प्रक्रिया पुन्हा राबवली जाईल व त्यामध्ये उक्त संस्था नव्याने भाग घेऊ शकते.
23. दत्तक कालावधी संपण्यापूर्वी दत्तक संस्था उचित कारणमिमांसेसह भूखंड महानगरपालिकेस 60 दिवसांची नोटीस देऊन परत करु शकते.
24. दत्तक कालावधी संपणे, संस्थेने स्वेच्छेने भूखंड परत करणे, संस्थेकडून भूखंड काढून घेणे इत्यादी कोणत्याही कारणासाठी भूखंड परत घेताना किंवा घेतल्यानंतर संस्थेने सदर भूखंडावर केलेल्या कोणत्याही खर्चाबद्दल संस्थेस कसलाही परतावा / नुकसान भरपाई दिली जाणार नाही.
25. भूखंडावर 'सदर भूखंड-------------------------- या संस्थेच्या वतीने विकसित करण्यात आला आहे/ परिरक्षित करण्यात येत आहे' अशा आशयाचा महानगरपालिकेचा लोगो व नाव शिर्षस्थानी असलेला 8' X 3' आकारमानाचा फलक जास्तीत जास्त दोन ठिकाणी लावता येईल. या व्यतिरिक्त पाच किंवा प्रती 1000 चौ.मी. क्षेत्रफळामागे एक यापैकी जे जास्त असेल तेवढे 2' X 1' आकारामानाचे छोटे फलकही संस्थेस लावता येतील.
26. दत्तक संस्था सहाय्यक आयुक्तांच्या परवानगीने तात्पुरती/ कायम पाणी/ विद्युत जोडणी घेऊ शकेल. पाणी/विद्युत बिल भरणे ही दत्तक संस्थेची जबाबदारी राहील.
27. सदर भूखंडाबाबतचे कर भरण्याची जबाबदारी परिशिष्ट -1 मध्ये दिल्याप्रमाणे राहील.

**XII)** सोबत जोडलेल्या परिशिष्ट तीन प्रमाणे काही भूखंड यापूर्वी

1) काळजीवाहू तत्वावर
2) दत्तक तत्त्वावर दीर्घ मुदतीसाठी
3) दत्तक तत्त्वावर अकरा महिन्यांसाठी देण्यात आले आहेत.

उक्त संस्थांनी या धोरणानुसार करारनामा केल्यास ते दत्तक तत्त्वावर तसेच ठेवण्यात येतील.

काळजीवाहू तत्त्वावर भूखंड घेतलेल्या किंवा दत्तक तत्त्वावर दीर्घ मुदतीसाठी भूखंड घेतलेल्या ज्या संस्थांना या धोरणानुसार करारनामा करण्याची इच्छा नाही त्या संस्थांना खालील दोन पर्याय उपलब्ध असतील

1) त्यांनी सदर भूखंडावर उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधांचे सध्याचे भांडवली मूल्य काढणे (घसारा विचारात घेऊन) व त्याच्या 50 टक्के रक्कम त्यांना नुकसान भरपाई म्हणून देऊन भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे. सध्याचे भांडवली मूल्य काढताना महानगरपालिका, आमदार स्थानिक विकास निधी, खासदार स्थानिक विकास निधी, जिल्हा नियोजन मंडळ अथवा इतर कोणत्याही शासकीय यंत्रणेच्या निधीतून तयार करण्यात आलेल्या सोयीसुविधांचा विचार करण्यात येणार नाही.

2) भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात घेणे व सदर भूखंडावर आवश्यक असणाऱ्या अंदाजे महसुली खर्चाच्या (प्रचलीत महानगरपालिका दरसुचीनुसार परिगणित केलेल्या) 50 टक्के दराने सदर भूखंडाच्या

परिरक्षणाची जबाबदारी इतर कंत्राटदारांप्रमाणे त्याच अटी-शर्तीवर विनानिविदा सदर संस्थेस पाच वर्षाच्या मुदतीकरिता सोपवणे व त्यांनी केलेल्या कामाचा दर्जा उत्तम असल्यास पुढे जास्तीत जास्त पाच वर्ष मुदतवाढ देणे.

**XIII**) यापुढे कोणताही भूभाग या धोरणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकाराने खाजगी संस्थेस देण्यात येणार नाही.

**XIV)** महानगरपालिकेची उद्याने, मनोरंजन मैदाने अथवा क्रीडांगणे खाजगी व्यक्तींना / संस्थांना विकासासाठी अथवा परिरक्षणासाठी देण्याची यापूर्वीची सर्व धोरणे विखंडित करण्यात येत असून यापुढे याबाबत फक्त हेच धोरण लागू राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/१.८.२०२३ | सही/२.८.२०२३ | सही/- | सही/१.८.२०२३ |
| ( जितेंद्र परदेशी ) | ( प्रदीप पडवळ ) | ( शरद उघडे ) | (किशोर गांधी) |
| **उद्यान अधीक्षक** | **प्रमुख लेखापाल (वित्त)** | **सहाय्यक आयुक्त डी विभाग** | **उप आयुक्त (उद्याने)** |

| | | | |
|---|---|---|---|
| सही/१.८.२०२३ | सही/१.८.२०२३ | सही/२.८.२०२३ | सही/३.८.२०२३ |
| ( संजोग कबरे ) | ( विश्वास शंकरवार ) | ( रमेश पवार ) | ( अश्विनी भिडे) |
| **उप आयुक्त (विशेष)** | **उप आयुक्त (परि.4)** | **सह आयुक्त (सुधार)** | **अति.आयुक्त (पूर्व उप.)** |

# परिशिष्ट - १

| अनु क्र. | वर्गवारी | मुदत | कार्यानुरुप हमी रक्कम रु. प्रति चौ.मी. | अनामत रक्कम रु. प्रति चौ.मी. | संस्थेच्या मूल्यमापनात विचारात घ्यावयाचा भूखंडाचा अंदाजे विकास खर्च रु. प्रति चौ.मी. | संस्थेने भरावयाचे कर | महानगरपालिकेने भरावयाचे कर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | जी मैदाने विकसित आहेत व ज्यांच्या दर्जोन्नतीसाठी येणारा भांडवली खर्च रक्कम रु. ५००/- प्रति चौ.मी. पेक्षा कमी आहे अशी मैदाने | 11 महिने | 25 | 250 | 250 | पाणी शुल्क, विज बिल, जीएसटी व इतर कर | मालमत्ता कर जमीन महसूल |
| २. | जी मैदाने अर्धविकसित आहेत व ज्यांच्या दर्जोन्नतीसाठी येणारा भांडवली खर्च रक्कम रु. ५००/- ते रक्कम रु.२०००/- प्रति चौ.मी. एवढा आहे अशी मैदाने | 3 वर्षे | 125 | 250 | 1250 | पाणी शुल्क, विज बिल, जीएसटी व इतर कर | मालमत्ता कर जमीन महसूल |
| ३. | जी मैदाने फारशी विकसित नसून त्यांच्या दर्जोन्नतीसाठी येणारा भांडवली खर्च रक्कम रु.२०००/- प्रति चौ.मी. पेक्षा जास्त आहे अशी मैदाने | 5 वर्षे | 300 | 250 | 3000 | मालमत्ता कर, पाणी शुल्क, विज बिल, जीएसटी व इतर कर | जमीन महसूल |

## परिशिष्ट - 2

भूखंडाचा प्रस्तावित विकासाचा आराखडा

(अ)

| अनु.क्र | सद्यस्थितीतील सुविधा | प्रस्तावित विकासाचे/श्रेणीवाढीचे वर्णन | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| 1 | | | |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | | |
| | | | एकुण - |

---

(ब)

भुखंडाचे एकुण क्षेत्रफळ - चौ.मी.

विकासाचा/श्रेणीवाढीचा एकुण खर्च - रु.

प्रती चौ.मी. खर्च - रु. / चौ.मी.

---

टीप:- विकास/श्रेणीवाढीचा नकाशा 1:500 स्केल मध्ये असावा.

| परिशिष्ट - 3 | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Maitained By** | **Ward** | **Name and address of plot** | **Area ( sqm)** | **Reservation Code** | **Reservation Text** | **Actual Use** | **Name of Agency** | **Remark** |
| 1 | 03_Adoption Old Policy | A | CPRA Garden, Cuffe Parade, | 12,000 | Other | Other | RG_Garden | | |
| 2 | 03_Adoption Old Policy | A | Sabina Chandrashekhar Garden, Nathalal Parekh Marg, Colaba | 12,800 | EOS_2.6 | Recreation Ground | PG | | |
| 3 | 03_Adoption Old Policy | D | Amarsons Udyan , Bhulabhai Desai Road, Beside Vaibhav Building Mumbai 400026 | 10,000 | EOS_2.6 | Recreation Ground | RG_Garden | M/S.Amers ons | |
| 4 | 03_Adoption Old Policy | D | Priyadarshani Park Nepean Sea Road Mumbai 400007 | 65,000 | EOS_1.5 | Garden_Par k | RGPG Both | M/s.Malbar Hill Citizen Forum | |
| 5 | 03_Adoption Old Policy | FS | St. Xaviors Playground, Bhoiwada, Naigaon, Mumbai 400015 | 15,065 | EOS_2.6 | Recreation Ground | PG | MDFA | Plot is handed Over to MDFA as per old adoption policy |
| 6 | 03_Adoption Old Policy | HW | Chhatrapati Sambhaji Udyan Union Park. Opp. Dr Ambedkar Road. Khar.(w) | 4,515 | EOS_2.6 | Recreation Ground | RG_Garden | M/s Bhajandas Bajaj Foundation | |
| 7 | 03_Adoption Old Policy | KE | Matoshri Meenatai Thackeray Maidan,CTS NO 188 & 189 , Village Majas, SVP Road Poonam Nagar ,Andheri (East), Mumbai -93. | 13,595 | EOS_2.6 | Recreation Ground | PG | Shiv samarth Shikshan Prakaran Sanstha | Shiv samarth Shikshan Prakaran Sanstha |
| 8 | 03_Adoption Old Policy | KW | karmayogi pushpakant anant mhatre play Ground ,CTS no.29 (pt) Mora Village,Juhu Village JVPD Scheme Mumbai-400049 | 11,000 | DOS_1.4 | Play Ground | PG | M/s Jan Seva Mandal & Educational Trust | |
| 9 | 03_Adoption Old Policy | KW | CTS No. 29 (pt) Mora Village juhu,JVPD Scheme,Mumbai-400049 | 8,730 | DOS_1.4 | Play Ground | PG | M/s West Mumbai Bharat Scout and Guides | |
| 10 | 03_Adoption Old Policy | KW | Markandai mehta maidan CTS no. 574, (pt) N.S rd.No.13 opp juhu Depot,JVPD scheme , Vile parle (W) | 4,226 | DOS_1.4 | Play Ground | PG | M/s Juhu Vile Parle Gymkhana Club | |

| Sr. No. | Maitained By | Ward | Name and address of plot | Area ( sqm) | Reservation Code | Reservation Text | Actual Use | Name of Agency | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 11 | 03_Adoption Old Policy | PS | Plot CTS No.1214/9,1214/10 ,vasri hill,near Rustamji Complex Malad W | 19,152 | EOS_2.6 | Recreation Ground | RG_Garden | Venus Cultural Association Chandra Raj bldg Chincholi bunder road, Malad (W) Mumbai 64 | |
| 12 | 03_Adoption Old Policy | PS | Gurunanak Udyan Tilak Nagar Rd. No.5 Goregaon (W) | 3,200 | EOS_1.5 | Garden_Park | RG_Garden | M/s Gurunanak Sabha Plot no 92, 5th Tilak Road, Motilal Nagar, Goregaon (west) Mumbai 62 | |
| 13 | 03_Adoption Old Policy | PN | Sheila raheja udyan,c.t.s.no 827 A/1C1(part),khada kpada,A.K.Vaidya marg,Dindoshi,Mal ad East,Mumbai-98 | 28,278 | EOS_2.6 | Recreation Ground | RG_Garden | M/s Ferrani hotels pvt ltd | |
| 14 | 03_Adoption Old Policy | RS | Shyam Naryan Singh Thakur, Manoranjan maidan CTS No.724, 725, 726, 729 & 760 near Thakur Vidya Mandir, Thakur Complex, Kandivali(E) Mumbai 400101 | 14,295 | EOS_2.6 | Recreation Ground | RGPG Both | Shivtej Aarogya Seva Sanstha | Developed |
| 15 | 03_Adoption Old Policy | RS | Netaji Subhash Chandra Bose Kridangan, Poinsur Gymkhana Marg bearing CTS no.70,80,81,81(1to 6)89-D, 71 to 74, 76 to 79, 83,84, 85 & 86 Kandivali (W).Mumbai 400067 | 40,806 | EOS_1.4 | Play Ground | RGPG Both | Poinsur Gymkhana | Developed |
| 16 | 03_Adoption Old Policy | RS | Plot CTS No.809/A/1/7, Thakur village, near Shyam Narayan School, Opp. Dream Park, Kandivali(E) Mumbai 400101 | 2,178 | EOS_1.4 | Play Ground | PG | Shyam Narayan Thakur School, Thakur Education Trust | Developed |
| 17 | 03_Adoption Old Policy | RS | Plot CTS No.1104 to 4(pt)1104/1, Parekh Ngr., Nr.Spring club, Kandivali(W)Mum bai 400067 | 9,534 | EOS_1.4 | Play Ground | PG | Payyade Sports Club | Developed |

| Sr. No. | Maitained By | Ward | Name and address of plot | Area ( sqm) | Reservation Code | Reservation Text | Actual Use | Name of Agency | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | 03_Adoption Old Policy | RS | Plot CTS No.1102 & 1103, Parekh Nagar, Kandivali(W)Mumbai 400067 | 10,196 | EOS_1.4 | Play Ground | PG | Payyade Sports Club | Developed |
| 19 | 03_Adoption Old Policy | RC | CTS no - 393, (part) of at the Jn. Of D P road, Devidas Jn road, Borivali (W) Mumbai400092 | 4,535 | EOS_1.5 | Garden_Park | RG_Garden | M/s. Borivali sanscrutik kendra | |
| 20 | 03_Adoption Old Policy | RC | Swatantryaveer Savakar Udyan, FP No.128, Behind M.K. School L.T. Road, Borivali(W), Mumbai | 25,396 | EOS_1.5 | Garden_Park | RG_Garden | M/s. Poinsur Gymkhana | |
| 21 | 03_Adoption Old Policy | MW | RG Vatsalatai Naik Nagar, Suman nagar, E.E. Highway, Chembur, CTS No. 116 (pt)/123 (pt) | 5,669 | ROS_1.5 | Garden_Park | RG_Garden | M/s. Bharat scout guide | |
| 22 | 03_Adoption Old Policy | MW | PG plot at Mahu village Road, CTS no. 232/A/1/3, Anik village | 19,506 | EOS_1.4 | Play Ground | PG | M/s. Dilip Vengsarkar foundation | |
| 23 | 03_Adoption Old Policy | L | Chatrapati Shivaji park, opp.Hindi Muncipal School, Kajupada, kurla west | 7,455 | ROS_1.5 | Garden_Park | PG | M/s.Shivaji Shikshan Mandal | |
| 24 | 04_Caretaker Old Policy | KE | Prabhodankar Thackeray Maidan,CTS NO 252 part, 255 part, 256 part, 257, 258, 259 260 part, 261, 262, 270, 271 part, 272 part, 274/2 part,435 part, Hissa No 23 , junction of M G Road and Shahaji Raje Marg, Vile Parle (East), Mumbai / 57. | 9,230 | EOS_1.4 | Play Ground | RG_Garden | Chatrapati Shivaji Smarak Samiti | Chatrapati Shivaji Smarak Samiti |
| 25 | 04_Caretaker Old Policy | KE | CTS no 190 B, JVLR , Jogesgwari east | 20,000 | EOS_2.6 | Recreation Ground | PG | Matoshree Arts and Sports Club | Matoshree Arts and Sports Club |
| 26 | 04_Caretaker Old Policy | KE | CTS No. 92A, Charat singh colony , chakala, Andheri east | 1,354 | DOS_1.4 | Play Ground | PG | G B pant foundation | G B pant foundation |
| 27 | 04_Caretaker Old Policy | KW | CTS No. 1582(pt) Plot no.34&35 village Vile Parle (w) Mumbai 4000049 | 21,015 | DOS_1.4 | Play Ground | PG | M/s Lion Clubs Of Bombay Willingdon Crescent | |

| Sr. No. | Maitained By | Ward | Name and address of plot | Area ( sqm) | Reservation Code | Reservation Text | Actual Use | Name of Agency | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 28 | 04_Caretaker Old Policy | PS | Probhodan Kridangan CTS No. 360, 360/1,Probhodhan Marg , Siddharth Nagar, Goregoan (W). | 12,885 | DOS_2.4 | Municipal Sports Complex | PG | M/s Prabhodhan, Prabhodhan Krida Bhavan Marg, Siddharth Nagar, Goregaon (West ) Mumbai 104 | |
| 29 | 04_Caretaker Old Policy | RS | CTS No.94-C at Mahaveer Ngr., Kandivali(W)Mumbai 400067 | 9,244 | EOS_2.6 | Recreation Ground | Other | Kamla Vihar Sports Club | Given on Adoption, Half portion developed as garden / half portion developed at Club |
| 30 | 04_Caretaker Old Policy | RC | Sachin Tendulkar Gymkhana CTS No.128A/59/1 vill. Kandivli, Borsapada, Borivali(W), Mumbai 400067 | 42,291 | ROS_1.4 | Play Ground | Other | M/s. Mumbai cricket Association | |
| 31 | 05_11 Months Maint. New Policy | D | Plot at 2nd lane Babulnath opp Bomaby International school Mumbai 400007 | 1,100 | EOS_2.6 | Recreation Ground | PG | M/s.Bombay International school | |
| 32 | 05_11 Months Maint. New Policy | HW | Sadhu Vaswani Garden, Junction of S.V.Road and Turner Road, Bandra (W), Mumbai - 50. | 2,086 | EOS_1.5 | Garden_Park | RG_Garden | Smt. Kamla Raheja Foundation | |
| 33 | 05_11 Months Maint. New Policy | HW | Vishanu Buva K.Udyan S.V Road,Khar (W) | 2,580 | EOS_2.6 | Recreation Ground | RG_Garden | Smt. Kamla Raheja Foundation | |
| 34 | 05_11 Months Maint. New Policy | HW | Rotary Park Main Avenue Road & 16th Road, Khar (w) | 12,809 | EOS_2.6 | Recreation Ground | RG_Garden | Smt. Kamla Raheja Foundation | |
| 35 | 05_11 Months Maint. New Policy | HW | Lions Juhu Municipal Children Park , FP no. 84/A, Juhu Road & Linking,Santacruz(w) | 4,800 | EOS_2.6 | Recreation Ground | RG_Garden | Smt. Kamla Raheja Foundation | |
| 36 | 05_11 Months Maint. New Policy | KW | CTS NO. 1216/2D village Versova, Panch marg, Andheri west | 468 | DOS_1.5 | Garden_Park | RG_Garden | M/s Ekta Manch | |

| Sr. No. | Maitained By | Ward | Name and address of plot | Area ( sqm) | Reservation Code | Reservation Text | Actual Use | Name of Agency | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 37 | 05_11 Months Maint. New Policy | PS | Plot bearing CTS No.620/F,village Chincholi Gokuldham, opp.Santosh nager Goregaon E | 25,000 | EOS_2.6 | Recreation Ground | RGPG Both | Aarey Bhaskar Sports and welfare Center II, Snehdeep, Pahadi shala Path no 2 , aarey marg, Goregaon ( east ) Mumbai 63 | |
| 38 | 05_11 Months Maint. New Policy | PS | Garden plot CTS No. 1223/3,1225/B village Malad South, near Khetan International School,Malad (west) | 2,313 | EOS_1.4 | Play Ground | PG | Navchetana Charitable Trust, Krushna reality, behind Sunder Nagar, off S.V road, Malad (West ) Mumbai 64 | |
| 39 | 05_11 Months Maint. New Policy | PN | "C.T.S. No. 160/B,163/D",Village Valnai, Near Garden Court, Behind Carmel Convent, Marve, Road, Malad (W),Mumbai - 400064. | 2,175 | EOS_1.4 | Play Ground | PG | Children Welfare centre highschool | |
| 40 | 05_11 Months Maint. New Policy | PN | "C.T.S. No.657/C,Vijarkarwadi, S.V. Road, Malad (W) | 2,800 | EOS_1.4 | Play Ground | PG | Om Siddhakalavati Devi Bhajani Mandal Trust | |
| 41 | 05_11 Months Maint. New Policy | PN | C.T.S No 190/A,Lurde colony,Gautam Buddha marg,Malad West,Mumbai-64 | 1,092 | ROS_1.4 | Play Ground | PG | M/s Yukti Infra projects LLP | |
| 42 | 05_11 Months Maint. New Policy | RS | Dr. Keshav Baliram Hedagevar Park, CTS No.111-E, 106, Mahaveer Ngr., Nr.Kapol Vidyanidhi Trust, Kandivali(W)Mumbai 67 | 4,078 | ROS_1.5 | Garden_Park | RG_Garden | Ms. Kapol Vidyanidhi International School | Developed |
| 43 | 05_11 Months Maint. New Policy | RC | CTS No. 2230/C, CTS NO 389/C,2231 village Eksar, Devidas lane, opp. Raghunath Tower, (Vanvihar) Borivali (w) | 3,497 | EOS_1.5 | Garden_Park | RG_Garden | M/s. Borivali sanscrutik kendra | |

| Sr. No. | Maitained By | Ward | Name and address of plot | Area ( sqm) | Reservation Code | Reservation Text | Actual Use | Name of Agency | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 44 | 05_11 Months Maint. New Policy | RC | CTS no 1543/A, garden plot at Jn. Of Link road, 18.30 wide D P road, Leading Eksar Koliwada, Borivali (w),Mumbai 400091 | 1,331 | EOS_1.5 | Garden_Park | RG_Garden | Siddhakala Vishvast Mandal | |
| 45 | 05_11 Months Maint. New Policy | RC | Atal Smruti Udyan,FP No.526,531,M Bhandari Marg,Borivali (W) | 9,264 | RSA_3.7 | Leisure Park | RG_Garden | M/s. Charkop Cultural and sports Foundation | |
| 46 | 05_11 Months Maint. New Policy | RC | R.G plot FP No.775, Natakwala lane, Borivali(W), Mumbai | 1,515 | EOS_2.6 | Recreation Ground | PG | Shree Mata Nirmaladevi Mahila Bachat Gat | |
| 47 | 05_11 Months Maint. New Policy | RC | Bar to Sena Medal Vijete Shahid Mejar Kautsubh Rane Maidan PG CTS No.128/A/27/3, Borsapada, vill. Kandivli, satyanagar,Borivli/ West | 9,053 | ROS_1.4 | Play Ground | PG | M/s. Atharva foundation | |
| 48 | 05_11 Months Maint. New Policy | RC | CTS No. 374/B/15, Chikoowadi, Borivali West | 643 | ROS_1.4 | Play Ground | PG | Navchaitanya Pratisthan | |
| 49 | 05_11 Months Maint. New Policy | ME | Sahakar Maharshi Rajaram Bapu Patil , Borla Govandi between P.L.Lokhande Marg & G.M.Link road Govandi, Mumbai- 43. | 9,539 | EOS_2.6 | Recreation Ground | PG | M/s. Kanakia Foundation | |
| 50 | 05_11 Months Maint. New Policy | L | Nahar Amrit Shakti Udyan, Nahar Amrit shakti road,Chandivali | 33,473 | ROS_1.5 | Garden_Park | RG_Garden | M/s Nahar builder | |
| 51 | 05_11 Months Maint. New Policy | L | RG behind nahar international school, Nahar Amritshakti Road,Chandivali | 5,204 | EOS_2.6 | Recreation Ground | PG | M/s. Principal, Nahar International School. | |
| 52 | 06_Earlier Caretaker / Adoption_now 11 Month | RN | Anandvan Maidan, CTS NO.1400/E & 1400-D/, Rotary Garden Plot, Anand nagar mahakal wadi, Dahisar /East | | EOS_1.4 | Play Ground | PG | M/s Rotary Club of Mumbai, Dahisar | |
| 53 | 06_Earlier Caretaker / Adoption_now 11 Month | RN | CTS no 1161/A opp vidyamandir school ,Chhatrapati Shivaji Road ,Dahisar East | 22,920 | EOS_1.4 | Play Ground | PG | M/s Dahisar Sports Foundation | |